| MHAH150003012025 | केस दाखल दिनांक | | १३/०२/२०२५ |
|---|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | | १७/०२/२०२५ |
| | केस निकाल दिनांक | | १८/०३/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष महिने दिवस<br>०१ ०१ ०१ |

**भाग अ**

| | | |
|---|---|---|
| | | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, नेवासा यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी – श्रीमती संध्या यु. सुळ)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.५५/२०२५**<br>**निशाणी क्र.३६** |
| | | गु.र.क्र.I–३८२/२०२४<br>पोलिस स्टेशन – नेवासा,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. |
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत नेवासा पोलीस स्टेशन,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर |
| प्रतिनिधीत्व | | सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.के.साबळे. |
| आरोपी | १. | **बाळासाहेब उर्फ बळीराम दत्तात्रय नाईक,**<br>वय – ५० वर्षे, व्यवसाय – मजूरी. |
| | २. | **आदिनाथ बाळासाहेब उर्फ बळीराम नाईक,**<br>वय – २१ वर्षे, व्यवसाय – मजूरी. |
| | ३. | **शुभम त्रींबक नाईक,**<br>वय – २४ वर्षे, व्यवसाय – मजूरी. |
| | ४. | **सुनिता बाळासाहेब उर्फ बळीराम नाईक,**<br>वय – ४४ वर्षे, व्यवसाय – मजूरी. |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व रा. जळका बु., ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. |
| प्रतिनिधीत्व | | आरोपींतर्फे विधीज्ञः– ॲड. श्री. आर. यु. पागिरे. |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | ०६/०४/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | ११/०४/२०२४ |
| दोषारोप दाखल दिनांक | १३/०२/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १०/०९/२०२५ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | ०७/०१/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | –– |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | १८/०३/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळासाहेब उर्फ बळीराम दत्तात्रय नाईक, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १०/०९/ २०२५ | भा.द.वी.कलम ३२६, ३२३,५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | –– | –– |
| २. | आदिनाथ बाळासाहेब उर्फ बळीराम नाईक, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १०/०९/ २०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | –– | –– |
| ३. | शुभम त्रींबक नाईक, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १०/०९/ २०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | –– | –– |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | सुनिता बाळासाहेब उर्फ बळीराम नाईक, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१-अ प्रमाणे नोटीस दिली. | १०/०९/ २०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |

**भाग क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | अशोक कारभारी पुंड (निशाणी २५) | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| | -- |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा –**

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | -- | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | एक अंदाजे ३ फुट लांबीचा व ०.६ एम.एम. जाडीचा लोखंडी गज. |

**न्यायनिर्णय**

(१८ मार्च, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे या गुन्ह्याकरिता चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे–**

२) फिर्यादी अशोक कारभारी पुंड याने दिनांक ११/०४/२०२४ रोजी नेवासा पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली की, दिनांक ०६/०४/२०२४ रोजी ०८.०० वाजता तो गावातील हनुमान मंदीरासमोर उभा असतांना आरोपी तेथे आला व काही कारण नसतांना त्याला शिविगाळ करू लागला. त्यावेळी त्याला समजावून घरी पाठवले. त्यानंतर त्याचा मुलगा आदीनाथ नाईक याने फिर्यादीची पत्नी सुमन हिला फोन करून शिविगाळ केली. त्यामुळे फिर्यादी व त्याची पत्नी आरोपींना समजावण्यासाठी जात असतांना रस्त्यात आरोपी भेटले. त्यांनी शिविगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. आरोपी शुभम याने फिर्यादीला जमीनीवर पाडले. आरोपी बळीराम याने लोखंडी गजाने फिर्यादीच्या पाठीवर, पायावर, डोक्यावर व डाव्या हाताच्या कांबीवर मारहाण करून फ्रॅक्चर केले. फिर्यादीची पत्नी सुमन हिस आरोपी सुनिता हिने खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादीचा चुलत भाऊ प्रमोद पुंड व गावातील इतर लोकांनी सोडवासोडव केली.

३) सदर फिर्यादवरुन नेवासा पोलीस ठाणे, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे गु.र.क्र.I– ३८२/२०२४ ने भा.द.वि. कलम ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा

दाखल करण्यात आला. त्याचा तपास पो.ना. एस. एन. माने यांनी केला व तपासाअंती आरोपींविरुध्द भा.द.वी. कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४) आरोपींविरुध्द नि. १६ लगत भा.द.वी. कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचुन दाखवुन समजावुन सांगीतले असता आरोपींने त्यांच्याविरुध्दचे दोषारोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

५) तसेच, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) चे निवेदन निशाणी क्र. ३२ ते ३५ खाली नोंदविण्यात आले.

६) अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. यु. पागिरे यांचा युक्तिवाद ऐकला.

७) खटल्यामधील साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ प्रस्तुत होतात. त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला लोखंडी गजाने पाठीवर, पायावर, डोक्यावर व डाव्या हाताच्या कांबीवर मारहाण करून इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचवली अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |
| २. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीच्या पत्नीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचवली असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी व त्याच्या पत्नीला उद्देशपूर्वक शिवीगाळ करून अपमान करून त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश होता असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |
| ४. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी व त्याच्या पत्नीला दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |
| ५. | आदेश काय ? | : | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता–**

८) वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन असल्याने पुराव्याच्या विवेचनाचे पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रात विचारात घेतलेले आहेत.

९) अभियोग पक्षातर्फे तपासलेला साक्षीदार क्र. १ अशोक हा फिर्यादी आहे. त्याने साक्ष दिली आहे की, आरोपी त्याच्या शेजारी राहत असल्यामुळे तो आरोपींना ओळखतो. घटना दिनांक ०६.०४.२०२४ रोजी त्यांच्या गावातील हनुमान मंदीराजवळ सायंकाळी घडली. त्यावेळी तो मंदीराजवळ असतांना आरोपी सोबत त्याचा किरकोळ शाब्दीक वाद झाला. त्यामुळे त्याने पोलीसात फिर्याद दिली. परंतु, पुढे सदर साक्षीदाराने फिर्यादमधील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. तसेच, त्याने आरोपींनी त्याला शिविगाळ करून जमीनीवर पाडले, लोखंडी गजाने मारून फ्रॅक्चर केले व त्याच्या पत्नीला खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली हे नाकारले आहे.

१०) फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्याला उत्तरसुचक

प्रश्न विचारण्यात आले. परंतु, त्यामध्ये त्याने फिर्यादमध्ये नमूद केल्याप्रमाणे घटना घडल्याचे, आरोपींने त्याला व त्याच्या पत्नीला लोखंडी गज, लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे व शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले. याउलट त्याने मान्य केले की, आरोपी व त्यांच्यात आपसात तडजोड झाली आहे व त्यांच्यातील वाद आपसात समजूतीने मिटवलेला आहे.

११) आरोपी व फिर्यादी यांनी त्यांच्यातील वाद आपसात समजूतीने तडजोड करुन मिटवलेला आहे. तशी पुरसीस निशाणी क्र. २४ वर दाखल आहे. सदरची पुरसिस व फिर्यादीचा पुरावा पाहता इतर कोणी साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हा आरोपींने केला हे सिध्द करण्याकरिता अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीता–**

१२) वरील विवेचनावरुन असा निष्कर्ष निघतो की, आरोपींना प्रस्तुत गुन्ह्यात गोवण्यास कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. खटल्यातील फिर्यादीने त्याच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिलेली आहे. परंतु, आरोपी व फिर्यादी यांनी आपसात समजूतीने तडजोडीने न्यायालयाबाहेर वाद मिटविला आहे. त्यामुळेच फिर्यादीने त्याच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिलेली असावी. म्हणून त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळेच फिर्यादीस प्रस्तुत न्यायनिर्णयाची माहिती व्हावी याकरीता नोटीस पाठविण्याची आवश्यकता नाही. जप्त मुद्देमाल एक अंदाजे ३ फुट लांबीचा व ०.६ एम.एम. जाडीचा लोखंडी गज हा मुल्यहिन असल्याने अपील कालावधी नंतर त्याचा नाश करणे योग्य ठरेल. सबब मुद्दा क्र. ५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपींने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रू.१०,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचे जामीन बंधपत्र सादर करावे. |
| ४. | जप्त मुद्देमाल एक अंदाजे ३ फुट लांबीचा व ०.६ एम.एम. जाडीचा लोखंडी गज हा मुल्यहिन असल्याने अपील कालावधी नंतर त्याचा नाश करण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.03.18 17:29:24 +0530

**(संध्या यु. सुळ)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, नेवासा.

नेवासा
दिनांक – १८/०३/२०२६.